भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. ७५०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०६/११/२०१७

१) सोन्याच्या दागीन्यांची व नगदी पैशाची चोरी:–

दिनांक ०४/११/२०१७ चे १८.१५ ते २०.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी सदानंद आसाराम आगाशे वय ५८ वर्ष रा. मैदामील मागे तकिया वार्ड भंडारा हे घराला ताला लावुन नातेवाईकाचे घरी कार्यक्रमास गेले होते. त्या दरम्यान कोणीतरी अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचे बेडरूमच्या मागील बाजुची लोखंडी खिडकी तोडुन घराच्या आत प्रवेश करून बेडरूम मध्ये कपाटात ठेवलेली एक सोन्याची चपलाकंठी वजन ३८ ग्रॅम, १ सोन्याचा गोप वजन २० ग्रॅम, १ सोन्याचा गोप वजन १५ ग्रॅम, १ सोन्याची अंगठी वजन १० ग्रॅम, १ सोन्याची अंगठी वजन ६ ग्रॅम ,सोन्याचे कानातील झुमके वजन ०७ ग्रॅम ,सोन्याचे कानातील टॉप्स वजन ०५ ग्रॅम, १ सोन्याचा मंगळसुत्र वजन १७ ग्रॅम, सोन्याचे कानातील जोड वजन १९ ग्रॅम, सोन्याचा गोप वजन १५ ग्रॅम, १ सोन्याची अंगठी वजन ०५ ग्रॅम, १ सोन्याची काळी पोत वजन १० ग्रॅम, ५ सोन्याच्या अंगठया एकुण वजन २३ ग्रॅम, १ सोन्याचा नेकलेस वजन १२ ग्रॅम, सोन्याचे गडे ३ नग वजन १० ग्रॅम, १ सोन्याची नथ वजन १० ग्रॅम, सोन्याचे मनी २२ नग वजन ०२ ग्रॅम व नगदी २६,५००/–रूपये असा एकुण ६,९३,५००/–रूपया चा माल चोरून नेला. अशा फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५७,३८० भादंवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक चेके पो.स्टे. भंडारा हे करीत आहे. आहेत.

२) गाय जातीच्या जनावराची हत्या करून गोमास बाळगुन मिळून आल्याने गुन्हा नोंद. :–

दिनांक ५/११/२०१७ चे १०.५० वा. दरम्यान यातील आरोपीने गाय जातीच्या जनावराची हत्या करून १० किलो ५०० ग्रॅम गोमास किंमत १०५०/–रूपये, १ लाकडी कुंदा कि. २०/–रूपये, एक मास कापण्याचा लोखंडी काता कि. ५०/–रूपये असा एकुण ११२०/–रूपया चा माल बाळगुन बैरागी वाडा भंडारा येथे मिळुन आला. अशा सर तर्फे फिर्यादी सपोनि. मनोज गभणे, पो.स्टे. भंडारा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४२९, भादंवी. सहकलम ५,५(क)९,९(अ) महा. प्राणी सरंक्षण अधिनियम १९७६(२०१५) चा महा. क्रमांक ५ अन्वये सुधारीत अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. मनोज गभणे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

३) जागेत अनाधिकृतपणे प्रवेश करून, अश्लिल शब्दात शिविगाळ करून धमकी दिल्याने गुन्हा नोंद.

दिनांक ५/११/२०१७ चे १९.३० ते २०.०० वा. दरम्यान यातील आरोपीने फिर्यादी हिरामण श्रावण बांते वय ७० वर्ष याचे पोलीस कॉलोनी तकिया वार्ड भंडारा येथील जागेत अनाधिकृतपणे प्रवेश करून त्यास अश्लिल शब्दात शिवीगाळ करून फिर्यादीच्या गाडीच्या काचाला मारून “

देखलुंगा '' अशी धमकी दिली. अशा फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४४७,२९४,५०६ भादंवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. गभणे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) अल्पवयीन मुलीस फुस लावुन पळवून नेल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक ३/११/२०१७ चे २४.०० वाजता ते दिनांक ४/११/२०१७ चे २१.०० वाजता दरम्यान यातील आरोपीने फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १७ वर्ष १० महीने हिला फुस लावुन पळवुन नेले. अशा फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३६३ भादंवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोलीस निरीक्षक डोंगरे पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**५) क्षुल्लक कारणावरून संगनमत करून, शिविगाळ करून, काठीने मारहाण करून दुखापत केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १६/१०/२०१७ चे २२.०० वा. दरम्यान यातील आरोपी हा त्याच्या घरासमोर शिवीगाळ करीत होता. तेव्हा फिर्यादीने त्याला '' शिवीगाळी का करते ? छोटा—बडा देखते जा । '' असे म्हणाला. त्याला त्याचा राग आल्याने आरोपीने त्याच्या दोन साथीदारासह संगनमत करून फिर्यादीला गांधीवार्ड देव्हाडी तुमसर ते तिरोडा जाणारा डांबरी रोड येथे मागेहुन काठीने कपाळावर, डाव्या हातावर, उजव्या हाताच्या पंज्यावर, डाव्या पायाच्या गुडग्यावर मारहान करून शिवीगाळ केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून व डॉक्टरांनी दिलेली एक्सरे रिपोर्ट प्राप्त झाल्या वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३२५,५०४,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो. हवा. सरोदे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**६) मोटार सायकलची पायदळ जाणा—या इसमास धडक, इसम जखमी.:—**

दिनांक ३०/१०/२०१७ चे १८.३० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी जखमी चेतन देवदास वासनिक वय २२ वर्ष रा. राजेगाव एम.आय.डि.सी. हा राजेगाव वरून कन्हाळमोह कडे एन.एच ०६ रोडने पायी जात असतांना यातील आरोपी मोटार सायकल चालक याने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व लापरवाहीने चालवुन पायदळ जाणा—या फिर्यादीला मागेहुन राजेगाव एम.आय.डि.सी. एन.एच. ६ रोड येथे धडक मारून जखमी केले. अशा फिर्यादीचे बयान व डॉक्टर रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखणी येथे कलम २७९,३३७ भा.द.वी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. संतापे पो.स्टे. लाखणी हे करीत आहेत.

**७) लकव्याच्या त्रासाला कंटाळून विहीरीत उडी घेवून महीलेचा मृत्यु.**

दिनांक ५/११/२०१७ चे ११.०० वाजता दरम्यान यातील मृतक श्रीमती देवका ताराचंद कळमकर वय ५५ वर्ष रा. येदुरबुची हीला लकव्याचा त्रास असल्याने शेतावर जात असतांना लकव्याच्या त्रासाला कंटाळुन रोडाजवळ असलेल्या सार्वजनिक विहीरीतील पाण्यात उडी घेवून बुडुन मरण पावली. अशा फिर्यादी प्रविण ताराचंद कळमकर वय ३४ वर्ष रा. येदुरबुची यांचे तोडी रिपोर्ट

वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास स.फौ. मेश्राम पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

## ८) दारूच्या नशेत रेल्वे लाईन वर रेल्वे खाली कटुन इसमाची आत्महत्या .:–

दिनांक ४/११/२०१७ चे २२.३० वाजता ते ५/११/२०१७ चे ७.०० वाजता दरम्यान यातील मृतक युगेश जयदेव मेश्राम वय १९ वर्ष रा. वांगी हा रात्री २०.०० वा दरम्यान दारू पिवुन घरी आला. त्याचे जेवन झाल्यानंतर वडीलांने '' दारू कशाला पिते '' असे हटकले असता नेहमी प्रमाणे घराबाहेर गेला. व दारूच्या नशेत रेल्वे लाईन वर रेल्वे खाली कटुन आत्महत्या केली. सकाळी ०७.०० वा दरम्यान मृतकचे प्रेत मिळुन आले. अशा फिर्यादी जयदेव वगनु मसराम वय ४७ वर्ष रा. वांगी याचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास स.फौ. पाटील पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

## ९) अवैध दारू अंडयांवर धाडी . :–

दिनांक ५/११/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, जवाहरनगर, कारधा, वरठी, अडयाळ व दिघोरी येथील अवैध दारू अड्डयावर धाडी घालुन एकुण ८ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ११५ लिटर हातभट्टी दारू व १ लिटर ८०० मि.ली. देशी दारू किंमती ५००/–रुपया चा माल असा एकुण १२,५५०/– रुपया चा माल जप्त करण्यात आला.

## १०) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक ५/११/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ८४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवाशी ०३ तीन सिटर वाहनांवरती ७ केसेस व ईतर वाहनांवरती ७४ केसेस करण्यात आलेले आहे.

(राजेंद्र नागरे)
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र.०७१८४-२५४६०१.

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.